Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

and

# TVES's Dhanaji Nana Mahavidyalaya, Faizpur

Tal. Yawal Dist. Jalgaon

NAAC Re-Accredited "A-Grade" with a CGPA 3.24

## Jointly organized One Day State Level Conference on

## "Indian Knowledge System (IKS)"

# CERTIFICATE

This is to certify that, डॉ.शाहीद मुस्ताक मुल्ला From वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड has actively participated and presented a Oral/Poster/Paper on topic entitled भारतीय ज्ञान प्रणालीच्या परिप्रेक्ष्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य आणि प्रशासकीय व्यवस्थापन: एक चिकित्सक अभ्यास in state level Conference jointly organized by TVES's Dhanaji Nana Mahavidyalaya, Faizpur & Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon, under Pradhan Mantri Uchchtar Shiksha Abhiyan (PM-USHA) Ministry of Education, Government of India, New Delhi on 05$^{th}$ January 2026.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Mr. Shivaji Magar<br>Co-coordinator | Dr. Vijay Sonje<br>Coordinator | Prof. Ashutosh Patil<br>Project Head PM-USHA<br>Soft Component KBCNMU, Jalgaon | Prof. S. R. Kolhe<br>Convener PM-USHA<br>KBCNMU, Jalgaon | Dr. Rajendra.B. Waghulade<br>Principal |

E-ISSN 2582-5429
SJIF Impact - 6.86

# AKSHARA
## MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Peer-Reviewed & Refereed International Research Journal
January 2026 Special Issue 23 Volume I (A)

## TVES's Dhanaji Nana Mahavidyalaya, Faizpur

One Day State Level Conference on

# Indian Knowledge System (IKS)




Chief Editor Dr. Vijay Sonje Co-Editor Mr. Shivaji Magar

Chief Editor : Dr. Girish S. Koli

Akshara Publication

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**and**

# TVES's Dhanaji Nana Mahavidyalaya, Faizpur

**jointly organized**

**One Day State Level Seminar**

**on**

# Indian Knowledge System (IKS)

**Date- 5th January 2026**

**Co- Editor**
**Dr.Shivaji Magar**

**Chief Editor**
**Dr. Vijay Sonje**

## Advisory Board

**Dr.R.B. Waghulde**
Principal
D.N. College Faizpur.

**Prof. Ashutosh Patil**
Project Head,
Soft Component
KBCNU, Jalgaon.

**R. S. Kolhe**
Convenior
PM-USHA,
KBCNU, Jalgaon.

*Akshara Publication*
Plot No. 42, Akshara Publication
Gokuldham, Wanjola Road, Bhusawal, Dist.Jalgaon [M. S.] India 425201

*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 6.86 / January 2026 / Special Issue 23 / Volume I (A)

# Editorial Board

## -: Chief & Executive Editor:–

**Dr. Girish Shalik Koli**
Dongar Kathora
Tal.Yawal, Dist. Jalgaon [M. S.] India Pin Code: 425301
Mobile No: 09421682612
Website:www.aimrj.com Email:aimrj18@gmail.com

## -:Co-Editors :–

- **Dr. Sirojiddin Nurmatov,** *Associate Professor, Tashkent Institute of Oriental Studies, Tashkent City, Republic Of Uzbekistan*
- **Dr.Vivek Mani Tripathi**, Assistant Professor, *Faculty of Afro – Asian Languages and Cultures, Guangdong University of Foreign Studies, Guangzhou, Guangdong, China*
- **Dr.Maxim Demchenko** *Associate Professor Moscow State Linguistic University, Institute of International Relationships, Moscow,Russia*
- **Dr. Wajira Gunasena,** *Lecturer, Dept of Languages, Cultural studies & Performing Arts University of Sri Jayewardenepura, Nugegoda, Sri Lanka*
- **Shiv Kumar Singh ,** *Lecturer, Indian Faculty of Arts and Humanities, University of Lisbon Portugal.*
- **Dr. Vijay Eknath Sonje,** *Associate Professor,* (Hindi) D. N. College, Faizpur [M. S.]
- **Mr. Nilesh Samadhan Guruchal,** *Assistant Professor* (English)Smt. P. K. Kotecha Mahila Mahavidyalaya, Bhusawal, Dist. Jalgaon [M. S.] India.
- **Dr. Shaikh Aafaq Anjum,** *Assistant Professor* (Urdu) Nutan Maratha College, Jalgaon. [M. S.] India.
- **Mr. Dipak Santosh Pawar,** *Assistant Professor* (Marathi)Dr. A.G.D. Bendale Mahila Mahavidyalya**,** Jalgaon [M. S.] India.

## PEER REVIEW POLICY

*AMRJ will send a copy of research work to the editorial board. The board will verify the same according to the rules of research methodology. Then plagiarism in the work will be checked. In case if the research methodology is not followed properly by the researcher, message will be given to the researcher and he/she will be asked to revise the work in a stipulated period. After checking research methodology and plagiarism, the work will be sent to the Peer Review Committee.*

## SINGLE BLIND PEER REVIEW BY EXPERT PEER REVIEWERS

*AMRJ adopts the Single Blind Peer Review Method. After checking research methodology and plagiarism, the work will be sent to the Peer Review Committee for review through email. AMRJ do not disclose the details of researcher to Peer Review Committee. The Peer Review Table will be displayed online according to the criteria decided by the Editorial Board. After the approval by Peer Review Committee, the research work will be published in the Issue. In case if any instructions received from Peer Review Committee, the same will be forwarded to the researcher and he/she will be asked to clear the matter. Editorial Board of AMRJ will be the final authority to decide whether a research work is to be published or not.*

**AMRJ Disclaimer:**

*For the purity and authenticity of any statement or view expressed in any article. The concerned writers (of that article) will be held responsible. At any cost member of Akshara's editorial Board will not be responsible for anyconsequences arising from the exercise of Information contained in it. AMRJ is an online research journal. It is printed only for the conavenience of reading and archiving its online content.* ***(Applicable in Jalgaon jurisdiction)***

*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 6.86 / January 2026 / Special Issue 23 / Volume I (A)

# संपादकीय



**डॉ. विजय एकनाथ सोनजे**

भारतीय ज्ञान परंपरा हमारे समाज की स्मृति, अनुभव और चिंतन का संचित रूप है। यह परंपरा केवल अतीत की धरोहर नहीं, बल्कि वर्तमान को समझने और भविष्य को दिशा देने वाली सजीव बौद्धिक शक्ति है। आज के समय में जब शोध और शिक्षा बहुविषयक और अंतर्विषयक दृष्टिकोण की ओर बढ़ रहे हैं, तब भारतीय ज्ञान परंपरा का गंभीर, व्यावहारिक और वैज्ञानिक अध्ययन और अधिक आवश्यक हो गया है। प्राचीन भारत में **गणित, खगोलशास्त्र, भूगोल, जीवविज्ञान, वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, शस्त्र एवं सामरिकशास्त्र, जनीतिशास्त्र, नैतिक शास्त्र, योग विद्या, समाजशास्त्र तथा स्त्री अध्ययन** जैसे क्षेत्रों में भी समृद्ध और व्यवस्थित ज्ञान परंपरा विकसित हुई थी। *अर्थशास्त्र* में निहित शासन-व्यवस्था और प्रशासनिक सिद्धांत, *धर्मशास्त्र* और *नीतिशास्त्र* में प्रतिपादित नैतिक मूल्य, *योगसूत्र* में वर्णित मानसिक-शारीरिक अनुशासन, तथा सामाजिक संरचना और पारिवारिक जीवन पर आधारित समाजशास्त्रीय चिंतन आज भी अत्यंत प्रासंगिक है।साथ ही **भाषा तथा प्रौद्योगिकी** जैसे अनेक क्षेत्रों में विकसित ज्ञान अत्यंत उन्नत और व्यवस्थित था।

शुल्बसूत्रों का गणित, आर्यभट और वराहमिहिर की खगोल दृष्टि, चरक और सुश्रुत की जैविक एवं चिकित्सकीय समझ, धातु-विज्ञान और रसायन की प्राचीन परंपरा, युद्धनीति और सामरिक चिंतन, तथा संस्कृत और प्राकृत जैसी भाषाओं की वैज्ञानिक संरचना—ये सभी भारतीय ज्ञान के ऐसे उदाहरण हैं जिन्हें आधुनिक विज्ञान और तकनीक के साथ संवाद में लाना आज की बड़ी आवश्यकता है।भारतीय ज्ञान परंपरा में महिलाओं की भूमिका केवल सामाजिक नहीं, बल्कि बौद्धिक और दार्शनिक भी रही है। गार्गी, मैत्रेयी जैसी विदुषियों से लेकर लोकपरंपराओं में स्त्री अनुभव तक, स्त्री चेतना और स्त्री ज्ञान भारतीय बौद्धिक परंपरा का अभिन्न हिस्सा रहा है। इन संदर्भों को आधुनिक स्त्री अध्ययन, समाजशास्त्र और मानवाधिकार विमर्श से जोड़ना आज के शोध की एक महत्वपूर्ण दिशा बनती जा रही है।

इसी व्यापक दृष्टि के साथ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जलगांव के **प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान सॉफ्ट कम्पोनन्ट** विभाग तथा **तापी परिसर विद्या मंडल संचालित धनाजी नाना महाविद्यालय, फैजपुर** द्वारा आयोजित **"भारतीय ज्ञान परंपरा (Indian Knowledge System)"** विषयक एकदिवसीय राज्यस्तरीय सम्मेलन अत्यंत समयोचित और विचारोत्तेजक सिद्ध हुआ है।

इस सम्मेलन में प्रस्तुत शोध लेख भारतीय ज्ञानपरंपरा के विभिन्न शास्त्रों और विचारधाराओं को नए प्रश्नों और समकालीन संदर्भों के साथ सामने लाते हैं। ये लेख परंपरा और आधुनिकता के बीच संवाद स्थापित करते हुए राजनीति, नैतिकता, योग, समाज, विज्ञान और स्त्री विमर्श जैसे विषयों को एक समग्र दृष्टि से देखने का प्रयास करते हैं। लोकज्ञान और शास्त्रीय ज्ञान के अंतर्संबंध को भी इन लेखों में गंभीरता से रेखांकित किया गया है।

इस शोधात्मक प्रयास को सफल बनाने में मेरे सभी सहकर्मियों का योगदान अत्यंत सराहनीय रहा है। प्राचार्य के मार्गदर्शन और संस्था के सक्रिय सहयोग से यह सम्मेलन केवल एक शैक्षणिक आयोजन न रहकर विचारों, दृष्टियों और शोध प्रवृत्तियों के आदान-प्रदान का प्रभावी मंच बन सका।

हमें पूर्ण विश्वास है कि इस शोध पत्रिका में प्रकाशित लेख शोधार्थियों, अध्यापकों और गंभीर पाठकों के लिए उपयोगी सिद्ध होंगे तथा भारतीय ज्ञान परंपरा को आधुनिक शिक्षा, समाज और विज्ञान से जोड़ने के प्रयासों को नई दिशा प्रदान करेंगे।

**डॉ. विजय एकनाथ सोनजे**
**मुख्य संपादक**

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 6.86 / January 2026 / Special Issue 23 / Volume I (A)

# Principal's Message ….



**Dr. R. B. Waghulde**

It gives me immense pleasure to extend my warm greetings on the occasion of the One-Day State-Level Seminar on "Ancient Indian Knowledge Systems (IKS)", organized under the Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan (PM-USHA) on 05 January 2026. Ancient Indian Knowledge Systems represent a vast, profound, and living intellectual heritage that has significantly contributed to diverse domains such as philosophy, science, mathematics, medicine, ecology, linguistics, ethics, and education. In the contemporary academic context, revisiting and critically engaging with these knowledge traditions is not merely an act of cultural remembrance but an essential scholarly responsibility

The integration of IKS with modern disciplinary frameworks can offer innovative perspectives, sustainable solutions, and value-based approaches to present-day challenges.

This seminar provides a meaningful platform for academicians, researchers, and scholars to deliberate upon the relevance, reinterpretation, and application of ancient Indian wisdom in modern higher education and research. Such academic dialogues are vital for nurturing interdisciplinary thinking and fostering a deeper understanding of indigenous knowledge systems within global academic discourse.

I sincerely appreciate the efforts of the organizing committee, faculty members, and all contributors who have worked diligently to make this seminar a success. I am confident that the deliberations, research papers, and discussions presented during this academic gathering will enrich scholarly understanding and inspire further research in the field of Indian Knowledge Systems.

I extend my best wishes to all the participants for fruitful deliberations and academic excellence, and I hope this seminar will serve as a catalyst for sustained research and innovation rooted in India's intellectual traditions.

***With best wishes....***

**Dr. R. B. Waghulde**
Principal
D. N. College, Faizpur

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 6.86 / January 2026 / Special Issue 23 / Volume I (A)

## शुभेच्छा संदेश..



**मा.शिरीष मधुकरराव चौधरी**

**अध्यक्ष**

तापी परिसर विद्या मंडळ, फैजपूर.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या प्रधान मंत्री उच्चतर शिक्षा अभियान (सॉफ्ट कॉम्पोनेंट) अंतर्गत तापी परिसर विद्या मंडळ, द्वारा संचलित धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर यांच्या वतीने दि. 5 जानेवारी 2026 रोजी संपन्न झालेल्या "भारतीय ज्ञान परंपरा (Indian Knowledge System)" या विषयावरील एकदिवसीय राज्यस्तरीय परिषदे निम्मित प्रकाशित करण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय शोध पत्रिकेचे प्रकाशनसाठी हार्दिक शुभेच्छा व अभिनंदन करताना मला अत्यंत आनंद होत आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात भारतीय ज्ञानपरंपरेचा अभ्यास, पुनर्मूल्यांकन व आधुनिक संदर्भात त्याची पुनर्रचना करणे ही काळाची गरज आहे. अशा परिषदांमुळे विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक कुतूहल निर्माण होऊन संशोधक, प्राध्यापक व अभ्यासकांना भारतीय विचारपरंपरेची सखोल ओळख होण्यास मोलाची मदत होईल.

या परिषदेस यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतलेल्या संयोजक, सह-संयोजक, समन्वयक, सह-समन्वयक तसेच यासाठी प्रेरणा देणारे महाविद्यालयाचे प्राचार्य यांचेही मनःपूर्वक अभिनंदन करतो या सर्वांच्या नियोजनबद्ध कार्यपद्धतीमुळे ही परिषद शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध व दिशादर्शक ठरली आहे तसेच यात चर्चा करण्यात आलेल्या विषय देखील आंतरराष्ट्रीय शोध पत्रिकेचे माध्यमातून प्रकाशित होत आहे व ही ज्ञान दीर्घकाळ एक दस्तावेज म्हणून जीवंत असणार आहेत व यातून सादर होणारे संशोधन लेख, विचारमंथन निश्चितच उपयुक्त ठरतील आणि भारतीय ज्ञानपरंपरेच्या अभ्यासाला नवी दिशा देतील, असा मला पूर्ण विश्वास आहे.

पुन्हा एकदा या अर्थपूर्ण शैक्षणिक कार्यासाठी संपूर्ण आयोजन समितीचे अभिनंदन करतो व भविष्यातही अशाच प्रेरणादायी उपक्रमांसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

मा.शिरीष मधुकरराव चौधरी
**अध्यक्ष**
तापी परिसर विद्या मंडळ, फैजपूर.
मा.आमदार, रावेर विधानसभा (महाराष्ट्र)

| Sr.N | Title of the Paper | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 29 | भारतीय रसायनशास्त्राचा समृद्ध वारसा: प्राचीन धातुशास्त्र ते बौद्धकालीन रसविद्या | **डॉ. संजीव साळवे**<br>**डॉ. अतुल बढे** | **99** |
| 30 | प्राचीन भारतीय नकाशाशास्त्र व भूगोल | **प्रा. राजू माधवराव केंद्रे** | **103** |
| 31 | भारतीय ज्ञानपरंपरा आणि आधुनिक मानसशास्त्र : एक तुलनात्मक अभ्यास | **डॉ. मिलिंद भगवानराव बचुटे** | **106** |
| 32 | भारतीय ज्ञान परंपरा और हिंदी साहित्य: दार्शनिक चेतना से आधुनिक विमर्श तक | **तेजस्विनी दिनकरराव पाटील** | **110** |
| 33 | भारतीय ज्ञानपरंपरा आणि राजकीय तत्त्वज्ञान: एक विश्लेषणात्मक अभ्यास | **डॉ.रामसिंग राज्या वसावे** | **112** |
| 34 | भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) मध्ये इतिहास विषयाचे महत्त्व | **प्रा. रमेश बापूराव जोगदंड** | **115** |
| 35 | प्राचीन भारतीय शस्त्र प्रणाली आणि आधुनिक भारतीय शस्त्र प्रणाली : एक अभ्यास | **डॉ. महादेव उत्तम तोंडे** | **117** |
| 36 | भारतीय ज्ञान प्रणाली : एक सामान्य अध्ययन | **तुकाराम सिताराम कोकरे**<br>**प्रा. डॉ. रमेश एस. शिंदे** | **121** |
| 37 | भारतीय ज्ञान प्रणाली आणि भारतीय भाषा | **प्रा.डॉ.संभाजी बाबाराव सावंत** | **124** |
| 38 | 'भारतीय ज्ञानपरंपरेत मराठी भाषेचे स्थान' | **डॉ. सुधाकर सीताराम चौधरी** | **126** |
| 39 | प्राचीन भारतीय ज्ञान परंपरेतील सांख्ययोग | **डॉ. दीपक लोटन सूर्यवंशी** | **128** |
| 40 | भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची (LIS) ची भूमिका | **डॉ.योगिनी धाकड व**<br>**राहुल पितांबर जाधव** | **131** |
| 41 | भारतीय ज्ञान प्रणालीच्या परिप्रेक्ष्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य आणि प्रशासकीय व्यवस्थापन: एक चिकित्सक अभ्यास | **डॉ.शाहीद मुस्ताक मुल्ला** | **134** |
| 42 | प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा आणि मराठी संत साहित्याचे अद्वितीय योगदान | **प्रा.रोहित वाडीले** | **137** |
| 43 | भारतीय ज्ञानप्रणाली आणि ध्यान | **प्रा. डॉ. छाया वेच्या ठिंगळे** | **139** |
| 44 | भारतीय नाण्यांचा इतिहास, विकास आणि वैशिष्ट्ये | **डॉ. दिपक प्रकाश महाजन** | **141** |
| 45 | IKS & Skill Based Education is the Need for Better Tomorrow | **Prof. Dr. Sudam G. Rathod** | **145** |
| 46 | प्राचीन भारतीय विद्यापीठ: जागतिक ज्ञानाची प्रकाशगृहे | **प्रा.सूर्यवंशी राहुल गुणवंत** | **148** |
| 47 | Beyond Sanskrit-Centrism: Pali, Prakrit, and the Multilingual Foundations of Indian Knowledge Systems. | **Dr. Liladhar Shivajirao Patil** | **151** |
| 48 | प्राचीन भारतीय ज्ञान प्रणाली : एक दार्शनिक अध्ययन | **डॉ उमा शर्मा** | **154** |
| 49 | भारतीय ज्ञानपरंपरा (IKS) आणि स्त्री संतकविता: देह, श्रम आणि सामाजिक नीतिशास्त्राचा पुनर्विचार | **प्रा. प्रशांत काशिनाथ पाटील** | **157** |
| 50 | भारतीय ज्ञान परंपरा :एक विवेचन | **डॉ. अमलपुरे सूर्यकांत विश्वनाथ** | **160** |
| 51 | प्राचीन भारतीय ज्ञान प्रणाली में विपश्यना ध्यान : दार्शनिक, ऐतिहासिक एवं व्यावहारिक अध्ययन | **प्रा. डॉ. सतीश दत्तात्रय पाटील** | **163** |
| 52 | राष्ट्रीय एकात्मता आणि भाषा संवर्धन: लोकसेवक मधुकरराव चौधरी यांचे कार्य आणि भारतीय ज्ञानपरंपरेतील प्रासंगिकता | **डॉ. मारोती किशनराव जाधव**<br>**वंदना देवाजी गावंडे** | **165** |
| 53 | जळगाव जिल्ह्यातील भूमीहीन शेतमजूर: सामाजिक-आर्थिक समस्या, पारंपरिक ज्ञान व धोरणात्मक पर्याय | **प्रा. डॉ. किरण वारके**<br>**प्रा. विवेकानंद रमेश महाजन** | **167** |

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 6.86 / January 2026 / Special Issue 23 / Volume I (A)

41

# भारतीय ज्ञान प्रणालीच्या परिप्रेक्ष्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य आणि प्रशासकीय व्यवस्थापन: एक चिकित्सक अभ्यास

**डॉ.शाहीद मुस्ताक मुल्ला**
राज्यशास्त्र विभाग,
वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

---

**सारांश-** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य हे केवळ एक राजकीय सत्तांतर नव्हते, तर ते भारतीय ज्ञान प्रणालीतील (IKS) लोककल्याणकारी राज्याचे एक उत्कृष्ट उदाहरण होते. प्रस्तुत शोधनिबंधात महाराजांच्या प्रशासकीय कार्यपद्धतीचा, अष्टप्रधान मंडळाचा, आर्थिक धोरणांचा आणि त्यांच्या लोककल्याणकारी निर्णयांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. हा अभ्यास सिद्ध करतो की, शिवरायांचे प्रशासन हे लोकाभिमुख, पारदर्शक आणि प्रगत व्यवस्थापन शास्त्राचा अजोड नमुना आहे.प्रस्तुत शोधनिबंध छत्रपती शिवाजी महाराजांच्या शासन प्रणालीचे 'भारतीय ज्ञान प्रणाली' (IKS) या चौकटीत विश्लेषण करतो. महाराजांनी केवळ परकीय सत्तांशी लढा दिला नाही, तर एक स्वयंपूर्ण आणि लोककल्याणकारी राज्यव्यवस्था उभी केली. यामध्ये अष्टप्रधान मंडळाचे विकेंद्रीकरण, गनिमी काव्याचे युद्धतंत्र, शेतीविषयक सुधारणा आणि नैतिक मूल्ये यांचा समावेश आहे. हा अभ्यास शिवकालीन प्रशासनाला जागतिक स्तरावरील आदर्श 'गव्हर्नन्स मॉडेल' म्हणून प्रस्थापित करतो.

**कळीचे शब्द-** स्वराज्य, अष्टप्रधान मंडळ, गनिमी कावा, रयतवारी, भारतीय ज्ञान प्रणाली, सुशासन, आरमार, लोककल्याण.

**उद्दिष्टे-**

१. स्वराज्याच्या संकल्पनेतील भारतीय सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांच्या मुळांचा शोध घेणे.
२. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा अभ्यास करणे.
३. गनिमी कावा आणि किल्ले व्यवस्थापनातील तांत्रिक प्रगती अधोरेखित करणे.
४. शिवकालीन आर्थिक आणि सामाजिक धोरणांचे समकालीन महत्त्व तपासणे.
५.महाराजांच्या धोरणांचा भारतीय ज्ञान परंपरेशी असलेला संबंध प्रस्थापित करणे.

**प्रस्तावना-**

स्वराज्यकर्ते' शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्रासाठीच नव्हे तर संपूर्ण विश्वासाठी एक प्रेरक सूत्र आहे ! ह्याच प्रेरकसुत्राच्या इतर अनेक सुत्रांमधील सर्वात महत्त्वाचे आहे 'सुराज्यकर्ते' हे सूत्र.भारतीय संस्कृतीत 'राजाने प्रजेचा पिता व्हावे' ही परंपरा अत्यंत प्राचीन आहे. मध्ययुगीन अंधकारमय काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी या परंपरेला 'स्वराज्य' या शब्दातून जिवंत केले. त्यांनी केवळ शून्यातून विश्व निर्माण केले नाही, तर विस्कळीत झालेल्या समाजमनाला स्वाभिमानाचे बाळकडू दिले. त्यांचे प्रशासन कौटिल्याचे अर्थशास्त्र, शुक्रनीती आणि महाभारतातील 'राजधर्म' यांच्याशी सुसंगत होते.भारताच्या इतिहासात स्वकर्तृत्वाच्या बळावर स्वराज्य निर्माण करून ते समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे श्रेय छत्रपती शिवाजी महाराज यांना जाते. मध्ययुगीन काळात (इ.स. १६३० ते १६८०) जिथे विविध परकीय शाह्यांचे अधिपत्य होते, तिथे महाराजांनी मावळ्यांना एकत्रित करून 'रयतेचे राज्य' निर्माण केले. हे स्वराज्य स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुत्व या लोकशाही मूल्यांवर आधारित होते. महाराजांची ही राज्यपद्धती प्राचीन भारतीय नीतिशास्त्र आणि आधुनिक व्यवस्थापन यांचा सुवर्णमध्य आहे.भारतीय ज्ञान प्रणाली (Indian Knowledge System) ही केवळ ग्रंथांपुरती मर्यादित नसून ती मानवी जीवन, समाजकारण आणि राष्ट्रनिर्मितीच्या प्रयोगांतून आकाराला आली आहे. या प्रणालीचा सर्वात देदीप्यमान आणि प्रायोगिक आविष्कार म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले 'स्वराज्य' होय. १७ व्या शतकात जेव्हा संपूर्ण भारतवर्ष परकीय आक्रमकांच्या विळख्यात अडकले होते, तेव्हा महाराजांनी केवळ सैन्यबळावर नव्हे, तर भारतीय नीतीशास्त्र, व्यवस्थापन कौशल्य आणि भौगोलिक ज्ञानाच्या आधारावर एका नव्या युगाची पहाट केली. 'स्वराज्य' ही संकल्पना केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरती मर्यादित नव्हती, तर ती 'स्व-धर्म', 'स्व-भाषा' आणि 'स्व-संस्कृती' यांच्या पुनरुत्थानाचा एक महान प्रकल्प होता. कौटिल्याचे 'अर्थशास्त्र', शुक्रनीती आणि महाभारतातील 'राजधर्म' यांसारख्या प्राचीन भारतीय सिद्धांतांना शिवरायांनी समकालीन संदर्भात पुनर्स्थापित केले. सत्तेचे विकेंद्रीकरण करणारे 'अष्टप्रधान मंडळ' असो किंवा बलाढ्य शत्रूला नामोहरम करणारी 'गनिमी कावा' ही युद्धनीती असो; या प्रत्येक घटकामागे भारतीय ज्ञान परंपरेतील सूक्ष्म नियोजन आणि दूरदृष्टी दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधात छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकीय प्रणालीचा अभ्यास हा पारंपारिक इतिहास या पलीकडे जाऊन, एक 'प्रगत व्यवस्थापन शास्त्र' (Management Science) आणि 'स्वदेशी शासन मॉडेल' या दृष्टिकोनातून करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय ज्ञान प्रणालीतील नैतिक मूल्ये आणि व्यवहारज्ञान यांचा संगम शिवकालीन प्रशासनात कसा झाला होता, याचे साधार विवेचन करणे हा या अभ्यासाचा मुख्य गाभा आहे.

**विषयविवेचन -**

स्वराज्य संस्थापक, कुळवाडी भूषण, रयतेचा राजा, जाणता राजा अशी बिरुधावली असणारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आदर्श त्यांनी आपल्या डोळ्यासमोर ठेवला छत्रपती शिवाजी महाराजांची प्रशासकीय व्यवस्था ही त्यांच्या राज्यकारभाराच्या प्रणालीवरून स्पष्ट

होते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची राजकीय प्रणाली आणि त्याचा भारतीय ज्ञानपरंपरेशी असलेला संबंध पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट केलेला आहे.

**स्वराज्याची संकल्पना: एक सांस्कृतिक आणि नैतिक अधिष्ठान**

भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये 'राज्य' हे केवळ कर गोळा करण्याचे साधन नसून ते 'धर्म' (नैतिक कर्तव्य) प्रस्थापित करण्याचे माध्यम मानले गेले आहे. महाराजांचे स्वराज्य याच तत्त्वावर उभे होते.

महाराजांच्या 'स्वराज्याचा' अर्थ केवळ राजकीय सत्तांतर नव्हता, तर ते 'स्व-धर्म' आणि 'स्व-संस्कृती' यांचे रक्षण करणारे राज्य होते.

**१.लोककल्याणकारी राज्य:**"हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा" या वाक्यातून त्यांनी सत्तेचे दैवीकरण न करता, ती रयतेची सेवा या सूत्राचा शिवरायांनी प्रत्यक्ष अवलंब केला. स्वराज्यात रयतेच्या पिकाच्या देठालाही हात लावण्याची मनाई सैन्याला होती. दुष्काळ काळात शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि बी-बियाणांची मदत देऊन त्यांनी 'रयतेचा राजा' ही संकल्पना सार्थ केली.

**२. स्वधर्म आणि सांस्कृतिक अस्मिता:**परकीय आक्रमकांपासून धर्म, संस्कृती आणि भाषेचे रक्षण करणे हा स्वराज्याचा मुख्य उद्देश होता. त्यांनी 'राज्यव्यवहार कोश' निर्मिती करून प्रशासनात मराठी आणि संस्कृत शब्दांचा वापर वाढवला.

स्वराज्य म्हणजे केवळ भौगोलिक सीमांचे रक्षण नव्हे, तर भारतीय जीवनपद्धतीचे पुनरुज्जीवन होते. त्यांनी मंदिरांचा जीर्णोद्धार केला आणि विस्कळीत झालेल्या समाजाला 'स्वराज्य' या एका सूत्राखाली एकत्र आणले.IKS' मधील 'धर्म' (Duty) या संकल्पनेनुसार त्यांनी जात-पात विरहित न्यायदान केले.

**३. सत्तेचे दैवीकरण विरुद्ध उत्तरदायित्व:**

"हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा" असे म्हणून महाराजांनी सत्तेचा अहंकार नाकारला. त्यांनी स्वतःला राज्याचा मालक न समजता 'विश्वस्त' (Trustee) मानले. ही भावना भारतीय 'न्यास' (Trusteeship) संकल्पनेशी मिळतीजुळती आहे.भ्रष्टाचारमुक्त प्रशासन आणि रयतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य ही स्वराज्याची प्रमुख वैशिष्ट्ये होती.

**प्रशासकीय संरचना: अष्टप्रधान मंडळ**

शिवाजी महाराजांनी राज्यकारभारासाठी आठ मंत्र्यांचे एक मंडळ नियुक्त केले होते, ज्याला 'अष्टप्रधान मंडळ' म्हटले जाते. हे आधुनिक 'कॅबिनेट' व्यवस्थेचे आद्य स्वरूप मानले जाते.स्वराज्याचा राज्यकारभार सुरळीत चालवण्यासाठी महाराजांनी प्रशासनाचे विकेंद्रीकरण केले होते. हे मंडळ कौटिल्याच्या 'सप्तांग' सिद्धांताचे (राजा, अमात्य, जनपद, दुर्ग, कोश, दण्ड, मित्र) आधुनिक रूप होते.

**प्रशासकीय शिस्त:** प्रत्येक प्रधान आपल्या खात्याचा प्रमुख असला तरी, त्यांना एकमेकांशी समन्वय राखावा लागत असे.

**पारदर्शकता:** आज्ञापत्राद्वारे दिलेली प्रशासकीय नियमावली ही आजही व्यवस्थापन शास्त्रात आदर्श मानली जाते. उदाहरणार्थ, किल्ल्यावर साहित्याचा साठा कसा असावा, पगार कसा द्यावा, याचे सूक्ष्म नियोजन यात होते.

**गनिमी कावा: गनिमी कावा आणि संरक्षण नीती**

गनिमी कावा हे केवळ युद्धतंत्र नसून ती 'संसाधन व्यवस्थापन' (Resource Management) कला आहे. कमी सैन्य असताना बलाढ्य शत्रूला नमवण्याचे हे शास्त्र आहे. गनिमी कावा (Guerilla Warfare) हे भारतीय ज्ञान प्रणालीतील 'कूटयुद्ध' आणि 'भूमितरंग' (Terrain Knowledge) यांचे मिश्रण आहे.

**किल्ले व्यवस्थापन:** महाराजांनी ३०० हून अधिक किल्ले बांधले किंवा जिंकले. किल्ल्यावर अन्नधान्य, पाणी आणि दारुगोळा याचे नियोजन इतके चोख होते की, कित्येक महिने वेढा पडला तरी किल्ला लढता येत असे."गड आला पण सिंह गेला" यांसारख्या घटनांतून गड-किल्ल्यांचे सामरिक महत्त्व सिद्ध होते. किल्ले हे केवळ संरक्षणाचे साधन नसून ते प्रशासकीय केंद्रे होती.

**आरमार (Navy):** "ज्यापाशी आरमार, त्याचा समुद्र" हे ओळखून त्यांनी भारतीय नौदलाचा पाया रचला. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग सारखे जलदुर्ग म्हणजे स्थापत्यशास्त्राचा अजोड नमुना आहेत.

**मनोवैज्ञानिक युद्धतुलना:** अफाट सैन्य असलेल्या शत्रूला (उदा. अफझल खान, शाहिस्तेखान) भौगोलिक दृष्ट्या प्रतिकूल असलेल्या ठिकाणी बोलावून त्यांचा पराभव करणे, हे उच्च दर्जाचे व्यवस्थापन कौशल्य होते. यात शत्रूच्या मानसिकतेचा आणि कमकुवत दुव्यांचा अचूक अभ्यास (S.W.O.T. Analysis) केलेला असे.

**गुप्तहेर खाते:**बहिर्जी नाईक यांच्या नेतृत्वाखालील गुप्तहेर खाते हे जगातील त्या काळातील सर्वात प्रगत खाते मानले जाते. 'माहिती' हेच शक्तीचे मुख्य स्रोत आहे, हे भारतीय ज्ञान परंपरेतील तत्त्व महाराजांनी ओळखले होते.

**आर्थिक आणि कृषी व्यवस्थापन (IKS दृष्टीकोन)**

भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया 'कृषी' आहे, हे ओळखून महाराजांनी क्रांतिकारी बदल केले.

रयतवारी आणि महसूल: त्यांनी मोजणीसाठी 'शिवशाही काठी' (मोजपट्टी) वापरली. जमिनीचा दर्जा ठरवून सारा निश्चित केला.

**तगाई कर्ज:** शेतकऱ्यांना नांगर, बैल आणि बियाणे घेण्यासाठी बिनव्याजी कर्ज दिले, जे पिकाच्या कापणीनंतर सोयीनुसार परत करायचे असे.

**स्थानिक बाजारपेठ:** कोकणातील मिठाच्या व्यापाराला संरक्षण देण्यासाठी त्यांनी परकीय मिठावर जादा कर लावला. हे 'व्हॅल्यू ॲडेड टॅक्स' (VAT) आणि 'स्वदेशी'चे प्राथमिक रूप होते.

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 6.86 / January 2026 / Special Issue 23 / Volume I (A)

**निष्कर्ष:**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकीय प्रणालीचा चिकित्सक अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, त्यांची राज्यपद्धती ही केवळ तात्पुरती व्यवस्था नसून ती भविष्यातील अनेक पिढ्यांसाठी एक 'मार्गदर्शक संहिता' आहे.

१. शाश्वत सुशासनाचा आदर्श: महाराजांनी 'रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका' ही आज्ञा दिली होती. हे शासनाचे प्रजेशी असलेले उत्तरदायित्व (Accountability) दर्शवते. आजच्या काळातही 'भ्रष्टाचारमुक्त प्रशासन' राबवण्यासाठी शिवकालीन नीती अत्यंत महत्त्वाची आहे.

२. स्वावलंबी अर्थव्यवस्था: शेती आणि स्थानिक व्यापार यांना प्रोत्साहन देऊन त्यांनी स्वावलंबी गावाची (Self-reliant Village) संकल्पना प्रत्यक्षात आणली. ही संकल्पना आजच्या 'आत्मनिर्भर भारत' मोहिमेसाठी प्रेरणादायी आहे.

३.IKS आणि आधुनिक व्यवस्थापन: गनिमी कावा, अष्टप्रधान मंडळ आणि जलव्यवस्थापन या सर्व गोष्टींकडे पाहिल्यास, शिवाजी महाराज हे केवळ एक महान योद्धा नसून ते एक 'मॅनेजमेंट गुरु' होते. भारतीय ज्ञान प्रणालीतील व्यावहारिक शहाणपण त्यांच्या प्रत्येक निर्णयातून दिसून येते.

थोडक्यात, महाराजांचे स्वराज्य हे न्याय, समता आणि मानवी मूल्यांचा परिपाक होते. त्यांचे प्रशासन जगातील कोणत्याही लोकशाही राष्ट्रासाठी आजही आदर्श ठरू शकते.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. सभासद, कृष्णाजी अनंत (१६९७): शिवछत्रपतींचे चरित्र (सभासद बखर), व्हीनस प्रकाशन, पुणे.
२. मेहेंदळे, गजानन भास्कर (२००८): श्री राजा शिवछत्रपती, खंड-१ व २, मेहता पब्लिशिंग हाऊस.
३. बाळकृष्ण (१९४०): Shivaji The Great, खंड-I, आर्य बुक डेपो, कोल्हापूर.
४. साळुंखे, गणपतराव (२०००): शिवकालीन राज्यव्यवस्था, सरस्वती प्रकाशन.
५. कुलकर्णी, अ. रा. (१९९६): शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे.
६. देशमुख, शरद (२००५): शिवछत्रपतींचे प्रशासन आणि व्यवस्थापन, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
७. पुरंदरे, ब. मो. (बाबासाहेब) (२०१५): राजा शिवछत्रपती, पुरंधरे प्रकाशन, पुणे.
८. अमात्य, रामचंद्रपंत (१७१५/संपादित): आज्ञापत्र, संपादन: पु. ल. देशपांडे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.